# विसर्जनस्थळी अदानी ग्रुपच्या कर्मचाऱ्यांची स्वच्छता मोहीम

*अदानी* इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या कर्मचाऱ्यांनी 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश देत गणेश विसर्जनस्थळी साफसफाई मोहिमांचे आयोजन केले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या दीडशेव्या जयंतीचे औचित्य साधून हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. अदानी इलेक्ट्रिसिटीचे २५०० कर्मचारी टीम बनवून शहरात स्वच्छता अभियान राबवत आहेत. दोन आठवडे सर्व कर्मचारी वेगवेगळ्या परिसरांतून कचरा गोळा करतील. उत्सवाच्या काळात शहर स्वच्छ राखण्यासाठी सहकार्य करतील. तलावांच्या ठिकाणी कर्मचारी तैनात करण्यात येतील, अशी माहिती कंपनीकडून देण्यात आली.